**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

VOL- IX | ISSUE- XI | NOVEMBER | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# बालकामगारांच्या समस्या: चिकित्सक अभ्यास

**प्रा.डॉ.मनोहर तोटरे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड ता.मुखेड जि.नांदेड

बालकामगार ही आधुनिक काळातील ज्वलंत समस्या आहे. त्यातून अनेक सामाजिक,आर्थिक, मानसिक,नैतिक, शैक्षणिक समस्या उद्‌भवतात नव्हे तर बालकांचे व्यक्तिमत्व, भावविश्व उध्वस्त होते. त्यांचा उत्कर्ष, विकास खुंटतो, समाजाची विकासाकडे होणारी झेप मंदावते. अर्थव्यवस्था खिळखिळी, कुंठीत होते.समाजाला या वर्गाचा भार उचलावा लागतो. बालकामगार देशाच्या, समाजाच्या विकासात भार उचलू शकत नाहीत. मुलांच्या शिक्षण प्रक्रियात व्यत्यय येतो, बालकामगारांचे आरोग्य खालावते, कौटुंबिक जीवनात अडचणी येतात, सामाजिक नियंत्रण विस्कळीत होते. त्यामुळे सामाजिक स्वाथ्यास धोका निर्माण होतो. प्रस्तुत प्रकरणात बालकामगारांच्या समस्याचा आढावा घेतांना आर्थिक, आरोग्य विषयक, शैक्षणिक, सामाजिक समस्या बाबत मिमांसा केली आहे.

**बालकामगारांच्या आर्थिक समस्या :**

आर्थिक जीवन आणि सामाजिक जीवनाचा अनन्य परस्पर पुरक सहसंबंध आहे. आर्थिक समस्यांच्या अंगाने विचार करताना प्रस्तुत अभ्यासासाठी निवडण्यात आलेले सर्वच (३००) बालकामगार मिळणा-या वेतनाविषयी असमाधानी आहेत. त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला खूपच कमी दिला जातो. (तालिका क्र.४.१५ नुसार) ७२.३३ टक्के व्यष्टींना २०० ते ६०० रु.वेतन मिळत होते. त्यातून त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करणा-या ४७.६६ टक्के व्यष्टीं होत्या. तर २१.६६ टक्के स्वतःचा उदरनिर्वाह करीत होते. आणि १५ टक्के व्यष्टी अनामत म्हणून घेतलेल्या रक्कमेत राबत होते. (तालिका ४.२३) बालकामगाराच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न (तालिका क्र. ३.११) १५००रु. ते २५०० रू. गटात ४० टक्के, २५०१ ते ३००० रू. गटात ३८.६६ टक्के होते. बालकामगारांना दिला जाणारा आठवडी पगार व मासिक पगार हा अतिशय तोकडा आहे. मूळातच बालकामगार हे स्वस्तात उपलब्ध होत असतात अशी धारणा असते. मुली बहुधा घरगुती कामात आहेत. त्यांनाही कमी व अनियमित पगार दिला जातो. थोडक्यात. बालकामगार हे समाजापासून दूर फेकले जातात, त्यांची आर्थिक पिळवणूक केली जाते.

बालकामगारांना प्रौढ कामगाराइतकेच कामाचे तास असतात. क्वचित प्रसंगी जास्तही असतात, तालिका क्र.४.२ न्वये ६ ते १२ तास काम करणारे ८७ टक्के व्यष्टी दिसून आल्या तर काही उत्तरदात्यांना १२ तासा पेक्षाही अधिक काम करावे लागत होते. परंतु या अधिक तास काम करण्याचा मोबदला मालकांकडून मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. एक प्रकारचे हे आमचे आर्थिक आणि शारीरिक शोषण आहे असे बहुतांश उत्तरदात्यांचे म्हणणे आहे.

**बालकामगारांच्या आरोग्यविषयक समस्या :**

बालकामगारांच्या वयाचा, मानसिक व शारीरिक क्षमतेचा विचार केला जात नाही. त्यांच्याकडून न पेलणारे कोणतेही काम करुन घेतले जाते. परिणामी बालकामगारांना अनेक आजारांचा सामना करावा लागतो.

बाल वयात श्रम केल्यामुळे बालकामगारांना पाठ दुखणे, डोके दुखणे, कंबर दुखणे, सर्दी, ताप, त्वचा रोग,पोट दुखी, श्वसनाचा त्रास अशा अनेक आजारांचा सामना करावा लागतो. त्यातच मालकाकडून मिळण्या-या वैद्यकीय सुविधाचा अभाव आहे. साधारणतः एकूण ३०० उत्तदरत्यांपैकी ४२.३३ टक्के बालकामगार हे आजारावर उपचार न घेणारे दिसून आले. जे बालकामगार उपचार घेतात तेही खाजगी दवाखान्यामध्ये त्यामुळे त्यांची मिळणारी मिळकत उपचारावर खर्च होते. तसेच ८४.३३ टक्के बालकामगारांच्या कुटुंबियात आजार दिसून येतात. दमा,टी.बी., कॅन्सर, फेफरे, वात इत्यादी गंभीर स्वरूपाचे आजार आढळून आले. रोजगार देणारे कोणत्याही वैद्यकिय सुविधा देत नव्हते किंवा वैद्यकिय भत्ता देत नव्हते.

**बालकामगारांच्या शैक्षणिक समस्या :**

मुले ही राष्ट्रीय संपत्ती आहेत. ती समृध्द व्हावी म्हणून भारताचे भवितव्य अबाधित ठेवण्यासाठी बालकांना सुसंस्कृत करणे, त्यांना शिक्षण प्रवाहात आणने गरजेचे आहे. मात्र उपजीविकेच्या साधना अभावी, तसेच शिक्षणाबाबत उदासिनता,

बालकास शिक्षणाची अभिरुची नसते. त्यामळे शिक्षणापसून वंचित राहतात. पर्यायाने बालश्रमिक म्हणून काम करतात. प्रस्तुत अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या एकूण उत्तरदात्यांपैकी (३०० पैकी) ३६.३३ टक्के व्यष्टीं हया निरक्षर आढळल्या. शाळा सोडलेले उत्तरदाते ४४.३३ टक्के तर कधीही शाळेत न गेलेले बालकामगार ३६.३३ टक्के व्यष्टी होत्या. त्याना शिक्षण प्रवाहात कसे अणावे ही प्रमुख समस्या आहे. तसेच त्यांच्या वडिलाची शैक्षणिक पातळी सुध्दा निम्न आहे. ६०.३६ टक्के व्यष्टींचे पालक निरक्षर, अक्षरशत्रु होते. (ता.क्र.३.८) इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षण धारक ३४.८९ टक्के. जेमतेम इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले, तांत्रिक शिक्षण, प्रशिक्षण, उच्चशिक्षण घेतलेले नगण्य, जेमतेम ५ टक्के होते तर ७९.२१ टक्के माता निरक्षर होत्या त्यामुळे मुलांचे शिक्षण, पालन पोषणा ऐवजी उत्तरदात्यांना कामास जुंपले. पालक अकुशल श्रमिक असल्याने मुलानांही तुटपुज्या वेतनावर राबावे लागते.

**बालकामगारांच्या सामाजिक समस्या :**

बालकामगारांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्या परावलंबी परस्पर-पूरक आहेत.ज्या परिसरात बालश्रमिक वास्तव्य करतात तेथे पुरेसा निवारा नसतो, मनाला शांतता देणारे अनुकूल वातावरण नसते. तेथे अपूरा निवारा, पुरेशा विश्रांतीसाठी खोल्या नसतात म्हणून कामाच्या ठिकाणी वास्तव्य करतात ज्यात हॉटेल,गॅरेज मध्ये काम करणारे उत्तरदाते आहेत.

हॉटेल, बार, गॅरेज व घरकाम करणा-या मुला-मुलींना होणारी शिवीगाळ, अश्लील शब्दाचा परिणाम अनुकरण सुलभ मनावर होतो. त्यांचे व्यक्तिमत्व दुभंगले जाते. बेकारी, दारिद्र्याची परिणती उत्पन्नाच्या विषम वितरणात होते. त्यामुळे कुटुंब आणि समाजाचे विघटन होते. त्यांच्या व्यक्तिमत्वावर नकारात्मक परिणाम होतो. शिक्षणा अभावी क्रिडा, कौशल्यापासून वंचित राहतात, शारीरिक, मानसिक संधी पासून दूर राहतात. कामाच्या ठिकाणचे वातावरण, कुटुंबातील वातावरण, व्यवसाय, आहार, कामाचे ठिकाण व निवासाचे,सभोवतालच्या परिसरातील प्रतिकूल वातावरण, वंचितता इत्यादी मुळे बालके सामाजिक, मानसिक, दृष्टया दुभंगली जातात. आई-वडिलाच्या व्यसनामुळे,व्यसनाच्या आहारी जातात. त्यांच्या जीवनाच्या आशा आकांशा नेस्तनाबुत होतात.

बालकामगाराच्या सामाजिक समस्यांच्या अनुषंघाने अभ्यासकर्त्याच्या निरीक्षणात कामाचे तास, निवासाचे वातावरण यामुळे सामाजिक घडामोडी पासून उत्तरदात्ते अलिप्त राहतात. बालकामगारांचे कुटुंब ज्या परिसरात वास्तव्य करते तो परिसर घाण,बकालवस्त्यांचा आढळून आला. ३५.३३ टक्के स्थलांतरीत कुटुंब प्रामुख्याने किरायाच्या घरात वास्तव्य करतात. ५६.६६ टक्के कुटुंब झोपडी व पत्र्याच्या कच्च्या घरात राहतात. एका खोलीत असणा-या ५७.४ टक्के व्यष्टी तर ३०.८७ टक्के व्यष्टी दोन खोल्यात वास्तव्य करणारी त्याच्या मुलांच्या व्यक्तिमत्वावर दुष्परिणाम होतो. त्यांना पुरेशी विश्रांती घेता येत नाही. कुटुंबातील संबंध ही फारशे सौख्याचे नाहीत. ६६ टक्के कुटुंबात सतत कटकटी, भांडणे होतात. तसेच इतर भावंडेही बालकामगार आहेत. १ ते ३ पर्यंत बालश्रमिक असणा-या भावंडाचे प्रमाण ९९.६६ टक्के आहे. या संदर्भात संशोधकांने काढलेल्या निष्कर्षाशी अभ्यासक सहमत आहे. अपूरा निवास, कुटुंबातील आशादायी वातावरणा अभावी बालकामगार कामाच्या ठिकाणी झोपतात, त्यांच्या निवास परिसरात दारिद्रय, निरक्षरता, रोजंदारी व्यवसाय दिसून येतात. शिक्षणाअभावी कौशल्य, नोकरीपासून वंचित असतात. शारीरिक, मानसिक विकासापासून पारखे होतात. संभाव्य व्यक्तिमत्व दुंभगले जाऊ शकते, उन्मार्गी वर्तनाचे बळी होवू नये, उत्पन्नाचे विषम वितरण, बेरोजगारी वाढू नये, स्थलांतराने अपसमायोजन होवू नये म्हणून बालकामगारांची संख्या कमी करावी त्यामुळे प्रौढांची बेकारी फैलावणार नाही, बालश्रम हे दुर्वतन समाजीकरण त्याचे बालकाच्या व्यक्तिमत्वावर दुष्परिणाम होतात. कौशल्य, शारीरिक, मानसिक संधी गमावितात त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. शारीरिक, मानसिक विकास खुंटतो.

**संदर्भ**

१. Nangia Parveen: Child Labour, Janakat Publishers, New Delhi. 1982. P. 80.

२. Ah-Eng, Lai: "The Little worker A study of child Labour in the small scale Industries of Penang." Development and change 13, Oct, 1982, p. 565. (Edi,) Nangia Parveen, Child Labour, Janakat Publishers, New Delhi, P. 50.

३. राम आहुजा, भारत की सामाजिक समस्याऐं, रावत पब्लिकेशन, नई दिल्ली, २००२, प्र.आ. पृ. क्र. २०७.

४. Nazir shaha, Child Labour in India, Anmol Publication, New Delhi, 1992 P. 77.

५. U. C. Sahoo, Arti. Child Labour Dimensions in India; An Appraisal (Edi,) Tripathy, Child Labour in India, Discovery Publishing House, New Delhi, 1996. P. 32.

६. Usha Kahnere, Arti, Child Labour in India, (Edi), Kamala Shrinivasan and Veend Gundotra, Asmta Publictions, New Delhi.1993. P. No. 27.

७. Murthy. S.: Causes and Dimensions An Empirical study, IEA Conference (83$^{rd}$) Volume of the Millennium, Jammu Universty, The Indian Economic Association, Calcutta, 2000, P. 565.

८. P. Anandharaja Kumar, (Arti) Child Labour- A Contemporary Social Evil, Child Labour In India, Social Action Vol. 48, 1998, P. 11.

९. Institute of Public Opinion, Monthly Commentary on Indian Economic Condition, December, 1973.

१०. UNICEF: "Analysis of the situation of Children in India." Country programming Exercise, April 1980,New Delhi, Table 3.1in Nangia, Prveen, Child Labour, Janak Publishrs, New Delhi,Pp. 30-39.